नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/01/2024 (शनिवार) सकाळ

**अधिसूचना**

**(अयोध्या येथील राममंदीर स्थापनेच्या संदर्भात नेहरू ग्राउंड, रामटेक येथील महामहोत्सव करिता जड वाहनांच्या रहदारीचे नियमनाबाबत)**

ज्या अर्थी, माझे असे निदर्शनास आणुन देण्यात आले आहे की, अयोध्या येथील राममंदीर स्थापनेच्या संदर्भात पोलीस स्टेशन रामटेक नागपूर ग्रामीण अंतर्गत नेहरू ग्राउंड, रामटेक येथे दि. १९.०१.२०२४ ते दि. २३.०१.२०२४ पावेतो महामहोत्सव कार्यक्रम आयोजीत करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमामध्ये रामटेक येथील स्थानिक नागरीक तसेच आजुबाजुच्या गावातील नागरीक मोठया संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता आहे. सदर कार्यक्रम आयोजीत करण्यात आलेले स्थळ हे रामटेक शहरातून जाणाऱ्या मुख्य रस्त्यालगत असल्याने वाहतूकीची कोंडी होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. वरिल परिस्थिती टाळण्यासाठी दि. १९.०१.२०२४ ते दि. २३.०१.२०२४ पर्यंत रोज सायंकाळी १८.०० वा. ते २३.३० वा. पर्यंत सर्व प्रकारची जड/अवजड वाहने तुमसर कडून रामटेक मार्गे नागपूरकडे व नागपूर कडून रामटेक मार्गे तुमसरकडे जाण्यास प्रवेश देणे सर्वसाधारण जनतेच्या जिवीतास धोकादायक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

त्या अर्थी, मी हर्ष ए पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर, मुंबई पोलीस अधिनियम कलम ३३ पोट कलम २(१) तसेच गृह विभाग क्र. एम. व्हि.ए.–०५८९/सी.आर–१०६१/टि.आर./ए–२, दिनांक १९.०५.१९९० अन्वये व ११५, ११६, ११७ मोटार वाहन कायदा (१९८८ चा नियम ५९) यानुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये माझ्या प्रभाव क्षेत्राखाली असलेल्या नागपूर जिल्हा (ग्रामीण) आदेश देतो की, अयोध्या येथील राममंदीर स्थापनेच्या संदर्भात पोलीस स्टेशन रामटेक नागपूर ग्रामीण अंतर्गत नेहरू ग्राउंड, रामटेक येथे होत असलेल्या महामहोत्सवामुळे दि. १९.०१.२०२४ ते दि. २३.०१.२०२४ पावेतो रोज सायंकाळी १८.०० वा. ते २३.३० वा. पर्यंत तुमसर कडून रामटेक मार्गे नागपूरकडे व नागपूर कडून रामटेक मार्गे तुमसरकडे जाणारे येणारे सर्व प्रकारची जड/अवजड वाहने वाहतुकी करिता बंद करण्यात येत आहे.

तसेच पर्यायी व्यवस्था म्हणुन खालील मार्ग वाहनांच्या वाहतुकीकरिता उपलब्ध आहेत.

दि. १९.०१.२०२४ ते दि. २३.०१.२०२४ पावेतो रोज सायंकाळी १८.०० वा. ते २३.३० वा. पर्यंत तुमसर कडून येणारे सर्व प्रकारचे जड/अवजड वाहन घोटीटोक–निमखेडा फाटा–तुमान–निमखेडा–तारसा–मौदा व कन्हान नागपूरकडे तसेच नागपूर कडून जाणारे सर्व प्रकारचे जड/अवजड वाहन मौदा टिपॉईंट–हमलापुरी फाटा (नगरधन)–हातोडी–मसला–अरोली–घोटीटोक–तुमसर मार्गे भंडाराकडे. सदर अधिसूचना दि. १९.०१.२०२४ ते दि. २३.०१.२०२४ पर्यंत अंमलात राहील.

सदर अधिसूचना आज दिनांक १९/०१/२०२४ रोजी माझे सही शिक्यानिशी जाहीर करण्यात येत आहे.

**हर्ष ए पोद्दार (भा.पो.से.)**

पोलीस अधीक्षक,
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. सावनेर** :— दिनांक २०/०१/२०२४ चे सकाळी ५/३० वा. ते ६/३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन सावनेर येथील पोलीस पथक पोलिस चौकी पाटणसावंगी परिसरात पेट्रोलिंग करीत असता गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन सावनेर पोलीस पथकाने पाटणसांवगी ते खापा रोड वरील रेल्वे फाटका जवळ नाकाबंदी करून बोलेरो पिकअप वाहन क्र. MH- 40/CM- 4116 व MP 28 G 4289 प्रत्येकी किंमती ६ लाख प्रमाणे १२ लाख या वाहनात एकूण ८ म्हशी व १ हेला एकूण किंमती २,६५,०००/— रुपयाचे अत्यंत क्रूर व निर्दयतेने डांबून आखूड दोरीने बांधून त्यांना चारा पाणी न देता दाटीवाटीने अपुऱ्या जागेत ठेऊन कत्तली करिता घेऊन जातांना वाहतूक करतांना मिळून आल्याने वाहन चालक **आरोपी नामे— १) संदीप रमेश कोलारे, वय २५ वर्ष रा. राजना जि. चिंधवाडा २) महेश सेवकराम जाधव वय ४८ वर्ष रा. राजना, पहिजे आरोपी वाहन मालक नामे— दुर्गेश बदखाने व बिद्रेश बदखाणे दोन्ही रा. राजना** यांचे विरुद्ध पोस्टे सावनेर येथे कलम २७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ३, ११(१) (घ), (ड), (च) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, सहकलम ५ (अ) ,९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ सहकलम ११९ महा. पो. अधि. १९५१ सहकलम १९२ (अ), १७९, १८४ मो.वा.का. अन्वये कारवाई करण्यात येत आहे.



**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**